Vimbartha




# अशशी पालखी सुरेख बाई म्हायारी धाडावी

'सोने आलीस ? दम जरा' हिराक्कानं सोनाच्या पायावर पाण्याचा तांब्या रिता केला, डोळचाला पाणी लावून दोन दिशेला दोन भाकरीचं तुकडं टाकुन दिलं. सोनाला बघून हिराक्काच पोट भरलं !

'गेल्या साली गौरीला आली न्हाईस. लई वाट बगितली बघ !'

'आगं आई, लेकी म्हणजे अंगनातलं दानं टिपायला आलेल्या चिमण्या कवा भूर्रदिशी उडून जातील त्याचा नेम न्हाई ! असं तूच म्हणायचीस न्हवं !'

'व्हय गं माजे चिमने' ए पारू, कुटं हाईस, सोनाला च्या कर, वाईच शिरावी कर. कवा पाटला गाडीत बसल्याली. भुक्याबळी असलं !'

'व्हय आत्याबाई, करते हं !' पारू तोंडभर हसून बोलली. यंदा माहेरी जाणं जमन नाही याची खंत तिनं तोंडावर दाखवली नाही तरी आपल्या सासू नणनेची गोड बोलाचाली ऐकून तिचं मन हिरमुसलं असून फेरातलं गाणं डोक्यात घुमत होतं 'असंल सासर द्वाड बाई कोंडून मारीत ! अशी पालखी सुरेख बाई म्हायारी...

'आई वैनी गेली नाही गं म्हायारी ?'

'जाईल फुडल्या वर्साला. गुदस्ताच लावली नव्हती. सारकं सारकं काय नडलय म्हायारी. तशीच उटसूट पळायची सवं लागती.'

'ते खरं हाय गं. पन तू जशी माज्या वाटकडं डोळं लावून बसली हुतीस तशीच तिची बी आई बघत असल का न्हाई ? का सुनला एक कायदा नी लेकीला दुसरा!'

'आगं मी काय आगळं करतोच काय ? पिडचा नू पिडचा हेच चाललंय. सुनंला जरवत न्हाई टेवली तर तिच्या कानात वार शिरल !'

'वारं शिरायला ती काय वासरू हाय ! खरंच बाई या अश्या वागन्यानच आमाला म्हायारची लई ओड वाटती जनू ! वैनीला घरात बघून मला बी बेस वाटलं होतं ! धुनी, भांडी, पानी काहीच करायला लागनार न्हाई ! मला तिच्या डोळ्यात पानी बघितलं न लई जीवाला लागलं ! तवा म्हटलं की भावजास्नी राग बायचं असं का वाटतया गं ! ती बी लाडाकोडात वाढल्याली एका आईची लेक. सासरला आली म्हनून लगीच तिला काय चार पाय फुटल्यात का गं हात ! जरा चुकलं की झाला तिच्या म्हायेचा वरडा ! आगं आई तू मला पुरनपोळी शिकीवलीस काय ! जलमभर चूलच फुकायची हाय म्हनून काय करू दिली नाहीस. पोळ्यादिशी आत्याबाईंनी शेराच्या पोळ्या कराव सांगितल्या की ! आगं आई, रडंच आवरंना मला ! मी खरं ते सांगितलं पन आत्याबाईंनी. दिवानसाबनी इवती बडबड केली की हिकडं पळून यावं वाटलं !

'सोने, सासून बोलायचं न्हाई तर कुनी बोलायचं!

त्या म्हातारी घोडीला कळूने का माजी लेक न्हानगी हाय ते!'

वैनी बी न्हानच होती की. एवडा राडा उपसून पुन्ह शेतावर जात होती तरी तुजी बडबड चालायचीच. कशा गं आई आपन बाया! आपल्याच जावोसंग वैर! असा सुनास्नी तुमच्याबद्दल जिवाळा वाटलं त्या म्हननारच.

"ताक करीते भारात पारात
आतीबाई नदीच्या पुरात...!"

'सोने आगं, राजा जसा परजला संबाळ तोबी, फटकारबी मारतो तसंच हाय हो. आमीबी लई सासुरवास भोगलाय. नशिबात आसल तसं भोगायला पाहिजे'

'आई राज करायला आता राजा बी न्हाई नी परदान बी. आनि तू तरी कशावर देखरेख करनार? शेत हाय का गुरंढोरं हाईत का चुलत. माळत, पुतने हाईत. सगळे धाई दिशा रोजगारासाठी पांगलं. त्यांचं मालक त्योच त्यांचा सासरा नि सासू! बायका नोकऱ्या करव्यात. मिळवव्यात. तुला सुईदोऱ्यासाठी बी दुसऱ्याच्या तोंडाकडं बघावं लागायचं. आता सासुरवास म्हनजे काप गेलं नी भोकं न्हायली अशातली गत!'

'तू म्हणतीस ते खरं हाय. कळतं पण वळत न्हाई. आपली पारूबी वेस ४।। रु. मिळवून आणतिया.'

'पन त्या पैशावर तिची सत्ता हाय काय? दादाकडून तू कंदी पैसं हिसकून घेतीस का? त्यो बापय!'

'सोने कुटं बोलाया शिकलीस एवडं? बाईमाणसानं एवढं तोंड वाजवूने.'

'आगं आई कोंबडा झाकला म्हणून काय सूर्व्या उगवायचा न्हातो का?'

✻

---

## हरिजनांना पाणी नाकारले

पाच जणांविरूद्ध गुन्हा दाखल

हरिजणांना पिण्याचे पाणी नाकारले व जातीवाचक शब्द वापरले, या आरोपावरून दापोलीच्या पोलिसांनी शिरवळ या गावातील पाच इसमांना ताब्यात घेतले आहे.

याबाबतीत असे समजते की, शिवरळ येथील एका सार्वजनिक विहिरीवर काही हरिजन मंडळी पाणी आणण्यासाठी गेली असता त्यांना गावातील काही मंडळींनी जातीवाचक शब्द वापरले व पाणी काढण्यास हरकत केली. या प्रकरणी हरिजन मंडळींनी दापोली पोलीस स्टेशनवर तक्रार नोंदविल्यावरून दापोलीचे पोलीस फौजदार एन्. ओ. पाटील यांनी पाच इसमांना ताब्यात घेतले आहे.

—सकाळ (१८ जुलै १९७७)

## हुंडा नाही म्हणून छळ

नागपूर ता. १ – दोनशे रुपये हुंडा आणला नाही म्हणून आपल्या तरुण पत्नीचा अमानुष छळ केला, तिच्या डोक्याचे मुंडन केले, दोन दिवस तिला घरात अन्नपाण्यावाचून डांबले व मारहाण केली, या आरोपाखाली दत्तू जाधव यास अटक करून पोलिसांनी त्यांच्याविरूद्ध गुन्हा नोंदविला आहे.

ही घटना २२ जुलैला नाशिक जिल्ह्यातील सटाणा येथे घडली. विधानसभेत ही माहिती गृहराज्यमंत्री आर. पी वळवी यांनी सांगितली.

—सकाळ (२ नोव्हेंबर १९७७)